"जनहिताय सर्वदा"

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दूरध्वनी क्र : ०२२-२२८१-०३८६ Email: labour7.icld-mh@nic.in

---

क्रमांक : इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७ दिनांक: ०७ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी- २२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता **तपासणी ते उपचार (Test to Treat)** योजना राबविण्याबाबत.

**संदर्भ:-** (१) शासन निर्णय क्र. इबांका-२०२३/ प्र. क. ७७/ काम-७, दि.०७.०८.२०२३.

(२) शासन शुध्दिपत्रक क्र. इबांका-२०२३/ प्र. क.७७/ काम-७, दि.०९.०१.२०२३.

(३) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. आरोग्य-२०२३/प्र.क्र.०९/ योजना-०२/२६००-ब/२०२४, दिनांक १२.०१.२०२४

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेसंदर्भातील बाबींवर मार्गदर्शन मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेसंदर्भातील मंडळामार्फत विचारणा करण्यात आलेल्या बाबीसंदर्भात आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याबाबत मला शासनाचे असे निर्देश आहेत:-

अ) सदर "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेचा कालावधी संदर्भ क्रमांक २ येथील शासन शुद्धिपत्रक दिनांक ०९.०१.२०२४ पासून ५ वर्षाकरीता राहील.

ब) संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०२३ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ अंतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचे करीता राबविण्यात येत असलेल्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेन्वये मंडळांतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये यांची लाभार्थी म्हणून गणना करण्यात आलेली आहे. त्यामुळे १० वर्षाखालील अपत्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय होत नाही. तथापि, दहा वर्षाखालील अपत्ये ही त्या त्या कुटुंबावरच अवलंबित असतात. त्यामुळे त्यांच्या आजारावरील खर्च हा त्या बांधकाम कामगारालाच करावा लागणार असल्याने सदर खर्चाची प्रतीपुर्ती न झाल्यास ते नैसर्गिक तत्वास धरून राहणार नाही. सबब मंडळाने संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार १० वर्षाखालील बांधकाम कामगाराच्या अपत्यास अपघात व आजारवरील खर्चाची प्रतीपूर्ती करण्यास एक **विशेष बाब** म्हणुन मान्यता देण्यात येत आहे.

क) सदर "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेअंतर्गत मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रतिवर्षात एकदा कमाल रु.७.०० लक्ष मर्यादेतच उपचारास पात्र राहील.

आपला,

( बा.सि.शिंदे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- निवडनस्ती (कामगार-७)